# ६ मार्च - विज्ञानलेखक गो. रा. परांजपे स्मृतिदिन

*जन्म – १३ जानेवारी १८९१ स्मृती – ६ मार्च १९८१*

प्रा. गोपाळ रामचंद्र परांजपे हे भौतिकशास्त्राचे नामवंत प्राध्यापक आणि मराठी भाषेतून शास्त्रीय विषयांवर लेखन व प्रसार करणारे वैज्ञानिक होत. ते सृष्टिज्ञान मासिकाचे संस्थापक व अनेक वर्षे संपादक होते. मराठीमध्ये विज्ञान परिभाषा निर्मिती साठी अखंड झटणारे कृतिशील व्यक्तिमत्त्व ही त्यांची विशेष ओळख होय. प्रा. परांजपे मुंबईच्या विज्ञान संस्थेत प्राध्यापक झाले. त्या काळी कोणतीही विज्ञान–तंत्रविषयक समस्या उत्पन्न झाली तर शासन विज्ञान संस्थेची मदत घेत असे. विजापूरच्या गोलघुमटाला हादरे बसत असत; ते कशामुळे बसतात हे शोधण्याचे काम प्रा. परांजप्यांकडे आले. गोलघुमटाजवळून रेल्वे जात असे. त्यामुळे हादरे बसत असतील, असा कयास होता. त्याची खात्री करण्यासाठी प्रा. परांजपे आपल्या विद्यार्थ्यांसह गोलघुमटाच्या बाल्कनीत रात्रीच्या वेळी बसले. कारण ती आगगाडी रात्री जात असे. पाण्याने काठोकाठ भरलेली बादली बाल्कनीत ठेवून ते गाडीची वाट पाहत बसले. गाडी जवळून जाऊ लागताच बादलीतील पाण्यावर कंदिलाचा उजेड पाडून ते निरीक्षण करू लागले. बादलीतील संथ पाण्यात तरंग उठू लागले. गाडी निघून गेल्यावर १५ मिनिटांनी तरंग थांबून पाणी संथ झाले. ह्या प्रयोगावरून गोलघुमटाला हादरे कशामुळे बसतात, हे निश्चित करता आले. (याच वेळी भूकंप मापनाच्या उपकरणाचा शोध लागला असला, तरी ते सर्वत्र उपलब्ध नव्हते).



मुलांना ते उत्तम शिकवीतच; पण मुलांनी स्वत: प्रयोग करावेत म्हणून त्यांनी प्रयोगशाळा, उपकरणे दुरुस्त करण्यासाठी कार्यशाळा सुरू केली. त्याखेरीज मुलांनी स्वत: निबंध लिहावेत व चर्चा करावी यांकरिता चर्चामंडळे काढली. जेव्हा नामवंत वैज्ञानिक मुंबईत येत तेव्हा त्यांची व्याख्याने ते आपल्या संस्थेत आयोजित करीत. अशा रीतीने विद्यार्थ्यांची सर्वांगीण प्रगती व्हावी यासाठी ते सतत प्रयत्न करीत असत. त्यांच्या हाताखाली शिकलेले होमी भाभा, एम.जी.के. मेनन, रँग्लर वि.वा. नारळीकर, प्रा. भा.मा. उदगावकर इ. विद्यार्थी पुढे भारताला ललामभूत ठरले. विज्ञान शिक्षण मराठीतून व्हावे, त्यासाठी पारिभाषिक शब्द मराठीत निर्माण व्हावेत, सर्वसामान्य लोकांसाठी मराठीतून विज्ञान विषयावर विपुल लेखन व्हावे, ही त्यांची कळकळीची इच्छा होती. त्यासाठी त्यांनी पुण्यातील नामवंत प्राध्यापक व इतर तज्ज्ञ लोकांची सभा घेतली. या सभेत मराठीत विज्ञानविषयक मासिक सुरू करावे असे ठरले. त्याप्रमाणे, १९२८ साली ‘सृष्टिज्ञान’ हे मराठी शास्त्रीय मासिक सुरू झाले. त्याची सर्व संपादकीय जबाबदारी गो.रा. परांजपे यांनी स्वीकारली.मासिकासाठी स्वत: परांजपे यांनी व प्रा. दि.धों. कर्वे, प्रा. आजरेकर, प्रा. आवटी, डॉ. भाजेकर इत्यादींनी लेखन करावयास सुरुवात केली. सृष्टिज्ञान मासिकाचे कार्य प्रा. परांजप्यांनी सतत ५३ वर्षे केले व या काळात डॉ. मो.वा. चिपळोणकर, डॉ.

गो.रा. केळकर, डॉ. श्री.द. लिमये, प्रा. क.वा. केळकर, डॉ. वा.द. वर्तक इत्यादी अनेक तज्ज्ञांना मराठीत लेखन करण्यास उत्तेजन दिले. 'सृष्टिज्ञान' मध्ये येणारे लेख शास्त्रीयदृष्ट्या अचूक असावेत, तसेच त्यांची भाषा सर्वांना सहज समजेल अशी सोपी असावी, यांवर त्यांचा कटाक्ष असे. त्यांनी स्वत:ही अशा प्रकारे शेकडो लेख लिहिले. त्यात भौतिकशास्त्रावर २६० लेख आहेत, तसेच ६१ शास्त्रज्ञांची चरित्रे आहेत. मराठीतून शास्त्रीय लेखन करण्यासाठी विविध शास्त्रांची मराठी परिभाषाही निर्माण करणे जरुरीचे होते. हाही त्यांच्या जिव्हाळ्याचा विषय होता. त्यासाठी सृष्टिज्ञान मध्ये त्यांनी पारिभाषिक शब्दसंग्रह प्रसिद्ध करावयास सुरुवात केली. १९६६ साली 'मराठी विज्ञान परिषद' स्थापन झाली. त्यात त्यांनी हिरिरीने भाग घेतला.पुणे मराठी विज्ञान परिषदेचे ते अध्यक्ष होते. १९६८ साली मराठी विज्ञान परिषदेच्या मासिक पत्रिके च्या पहिल्या अंकाचे तेव्हाचे शिक्षणमंत्री मधुकरराव चौधरी यांच्या हस्ते झाले. तेव्हा केलेल्या भाषणात प्रा. परांजपे यांनी पारिभाषिक शब्दसंग्रह शासनाने प्रसिद्ध करावेत अशी सूचना केली. तिला अनुसरून शासनातर्फे भाषा संचालनालय स्थापन करण्यात आले. पुढे यथावकाश प्रत्येक शास्त्रीय विषयांवर शासनातर्फे शब्दकोश प्रसिद्ध करण्यात आले. वयाच्या ८८ वर्षा पर्यंत प्रा.परांजप्यांची प्रकृती उत्तम होती. पुढील तीन वर्षांत ती हळूहळू ढासळत गेली व वयाच्या ९१व्या वर्षी त्यांचे निधन झाले.

◆

*संकलन : **मिलिंद पंडित,** कल्याण*


*With Best Compliments From*






SCAN®

**SCAN ELECTRONIC SYSTEMS**

**Head Office:**
1360, Shukrawar Peth, 304, A Wing, Bharat Bhavan, Pune - 411 002.
Tel.: 91-020-24479210 * Fax: 91-020-24488398
E-mail: scanelectronicsystems@gmail.com | www.scanelectronicsystems.com

**Udayan Phadke**
Partner - Mobile : 09372273303 * Office : 9822307797

**AVAILABLE HARDWARE PRODUCTS**
Universal Input Data Logger - Uniscan - 3200
Defined Input Scanners / Data Loggers
RS232-RS485-Ethernet Converters / Repeaters
Protocol Converters / Gateways for SCADA
Dedicated PLC's / Digital Input/Output Modules
Mass Flow Meter/ BTU Meters with MODBUS
Flow Indicators & Totalisers with MODBUS

**AVAILABLE SOFTWARE PRODUCTS**
TabLogger Steriliser Validation System-21CFR Part11 compliant & TabLogger Process monitoring and recording software 21 CFR Part11 compliant.

**E-mail: phadke@scanelectronicsystems.com**